# सरकारला म 'नो' ज जरांगे पा. दणका

बीड | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -३१३ | बुधवार, दि.१४ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | किंमत ३ रू | पाने ४

दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955







# पाटलांचा हट्ट पण सरकार निगरगट्ट!

## मनोज जरांगे पाटलांची प्रकृती खालावली

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज पाचवा दिवस असून त्यांची प्रकृती खालावल्याची माहिती आहे. जरांगे यांच्या नाकातून रक्तस्त्राव होत असून त्यांना बोलताही येत नाहीये.मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी गावात आमरण उपोषण सुरू केलं आहे. आज त्यांच्या उपोषणाचा पाचवा दिवस असून जरांगे यांनी अन्न तसेच पाण्याचा त्याग केला आहे. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावल्याची माहिती आहे. जरांगे यांच्या नाकातून रक्तस्त्राव होत असून त्यांना बोलताही येत नाहीये. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

दरम्यान, डॉक्टरांचं एक पथक तातडीने अंतरवाली सराटी येथे दाखल झालं आहे. मात्र, जरांगे यांनी उपचार घेण्यास नकार दिला आहे. जोपर्यंत राज्य सरकार सगेसोयरे अध्यादेशाचा कायदा आणि विशेष अधिवेशन बोलावून मराठा समाजाला न्याय देत नाही, तोपर्यंत मी माझे उपोषण माघार घेणार नाही, अशी भूमिका जरांगे यांनी घेतली आहे.त्यांच्या या भूमिकेमुळे डॉक्टरही चिंताग्रस्त आहे. नाकातून रक्त येणे ही गंभीर बाब असल्याचं डॉक्टरांनी म्हटलं आहे. जरांगे पाटील यांनी तातडीने आपलं उपोषण मागे घेऊन अन्न तसेच पाणी घ्यावं, अशी मागणी मराठा बांधव करीत आहेत. दुसरीकडे, प्रशासकीय अधिकारी देखील मनोज जरांगे पाटील यांची भेट घेण्यासाठी अंतरवाली सराटी गावात पोहचले आहेत. अधिकाऱ्यांकडून जरांगे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, जरांगे यांनी कुठलीही तडजोड नाही, आधी मागण्या पूर्ण करा अन् मगच माझ्याकडे या, अशी भूमिका घेतली आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मराठा समाजाची फसवणूक करीत असल्याचा आरोप जरांगे यांनी केला आहे.



नाकातून रक्तस्त्राव अन् बोलताही येईना; डॉक्टरही चिंतेत

येत्या 14 तारखेला बुधवारी मराठा आरक्षण अंमलबजावनी साठी सकल मराठा समाजाकडून शांततेत

## 14 फेब्रुवारी महाराष्ट्र बंद



बीड शहर पोलीस स्टेशनचे पीआय बल्लाळ यांचां सत्कार करतांना भाजपाने नवनाथ शिराळे,माजी नगरसेवक दत्ताभाऊ थीगळे, बाबुराव परळकर, रंगनाथ भोसले



माजलगांव ।प्रतिनिधी
तालूक्यातील मनूर येथीलसर्व्हे नं.२४ मधिल फेरफार रद्दबातल करून सातबारावरील नोंद असलेल्या नावावर कायम आळा मारून, पूरग्रस्तांसाठी संपादित केलेल्या क्षैत्रातील पूरग्रस्तांच्यानावाची नोंदसातबारा उतार्यावरघ्यावी या मागणीसाठी पूरग्रस्तांच्या नावावर घेण्यासाठी पूरग्रस्त बचाव कृती संघर्ष समितीच्या वतिने उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयासमोर सर्व ग्रामस्थांचे अनोखे अंदोलन करण्यात आले,या वेळी राजकीय व सामाजिक नेत्यांनी जाहिर पाठिंबा दर्शवुन दिला या वेळे मोजे मनूर चे सर्व ग्रामस्थ अंदोलन करताना.

# निखिल वागळे यांच्यावरील हल्ला : ठोस भूमिका ठरविण्यासाठी

## राज्यातील पत्रकार संघटनांची २१ फेब्रुवारी रोजी मुंबईत बैठक

मुंबई।प्रतिनिधी

ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्यावर झालेला प्राणघातक हल्ला आणि एकूणच राज्यातील पत्रकारांवरील वाढते हल्ले या संदर्भात ठोस आणि निर्णायक भूमिका घेण्यासाठी राज्यातील प्रमुख पत्रकार संघटनांची महत्वाची बैठक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी मुंबई मराठी पत्रकार संघात होणार असल्याची घोषणा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केली.. निखिल वागळे यांच्यावर पुण्यात झालेल्या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी काल मुंबई मराठी पत्रकार संघात निदर्शने करण्यात आली.. यावेळी मुंबईतील सर्व प्रमुख पत्रकार संघटना सहभागी झाल्या होत्या.. निखिल वागळे यांच्यावरील हल्ला म्हणजे माध्यमांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न आहे..या विरोधात सर्व पत्रकार संघटनांनी एकजूट कायम ठेवण्याची गरज सर्वच वक्त्यांनी व्यक्त केली.. निखिल वागळे यांच्या प्रमाणेच राज्यात गेल्या सहा महिन्यात ३६ पत्रकारांवर हल्ले झाले असून निवडणुकांच्या काळात असे हल्ले वाढणार आहेत.. या विरोधात केवळ निषेध करून चालणार नाही तर काही ठोस भूमिका घ्यावी लागेल अशी सूचना बहुतेक वक्त्यांनी केली.. त्यानुसार विचार विनिमय करून निर्णय घेण्यासाठी राज्यातील प्रमुख पत्रकार संघटनांची २१ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी २ वाजता मुंबई मराठी पत्रकार संघात बैठक घेण्यात येणार आहे..या बेठकीत आंदोलनाचा पुढील दिशा ठरविली जाईल..

या निदर्शने आंदोलनास जोरदार प्रतिसाद मिळाला.. या आंदोलनात अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद मुंबई मराठी पत्रकार संघ, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ, टीव्हीजेए, मुंबई प्रेस क्लब, म्हाडा पत्रकार संघ, क्राईम रिपोर्टर असोशिएशन, बृहन्मुंबई महापालिका पत्रकार संघाचे प्रतिनिधी सहभागी झाले होते..यावेळी काही सामाजिक संघटना,कामगार संघटनानी सहभागी होत आंदोलनास पाठिंबा दर्शविला.. निदर्शकांनी गगनभेदी घोषणा दिल्या.. मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निषेध सभेत मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, कार्यवाह संदीप चव्हाण, विश्वस्त राही भिडे, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, मुंबई प्रेस क्लबचे अध्यक्ष गुरबीरसिंग, जतीन देसाई, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे कार्यवाह प्रवीण पुरो, मुंबई क्राईम रिपोर्टर असो.चे शाहिद अन्सारी, म्हाडा पत्रकार संघाचे अध्यक्ष दीपक पवार, मुंबई महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष विष्णू सोनावणे तसेच ज्येष्ठ पत्रकार जतीन देसाई, युवराज मोहिते, संजीव साबडे,संजय परब, एनडीटीव्हीचे मिश्रा आदिंनी निखिल वागळे यांच्यावरील हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला.. हे आंदोलन दोन तास चालले.. कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आज राज्यात अनेक ठिकाणी पत्रकार संघटनांनी आंदोलनं करून निखिल वागळे यांच्यावरील हल्ल्याचा निषेध केला आहे..



एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय

आपणास कळविण्यात येते की, दि.१४ फेब्रुवारी २०२४ रोजी होणारा कार्यक्रम दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी होणार आहे.

शुध्द सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!

दहिवाळ सुवर्णकार

॥ स्थलांतर व भव्य शुभारंभ ॥

* नविन पत्ता *

दहिवाळ सुवर्णकार

गुरूवार दि.१५ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११:०० वा.

आशापुरा कॉम्पलेक्स,डी.पी.रोड, सारडा नगरी जवळ, बीड.
फोन.02442-230377, 8432771777

शाखा : जगताप प्लाझा, सुभाष रोड, माळीवेस, बीड.
फोन.02442-220377, 9405072777

BIS Hallmark DS

शासनमान्य होलमार्क प्रमाणित सुवर्णालंकाराचे वातानुकूलीत दालन...





वडवणी ।प्रतिनिधी

दिनांक १२/२/२०२४ सोमवार रोजी भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय बीड येथे भाजपा राष्ट्रीय सचिव लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनानुसार, बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, कामगार मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष विजय हरगुडे,मराठवाडा अध्यक्ष दादासाहेब नन्नवरे, बीड जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश गिरी यांच्या हस्ते व माजलगाव मतदार संघाचे युवा नेते बाबरी शेठ मुंडे यांच्या विनंती वरूण कामगार मोर्चा वडवणी तालुका अध्यक्ष पदी शंकर झाडे व उपाध्यक्ष पदी नारायण जाधव यांची निवड करण्यात आली.व नियुक्ती पत्र दिले .यावेळी भाजप महिला नेत्या संध्याताई राजपूत,अनिताताई जाधव,प्रिती कुकड्या मॅडम, ऋषिकेश स्वामी,इतर मान्यवर उपस्थित होते. शंकर झाडे याची निवड आपण आपल्या पातळीवर संघटन कौशल्याने आपल्या तालुक्यात भाजपा कामगार मोर्चा चे संघटन वाढवावे.विविध क्षेत्रातील संघटित व असंघटित कामगारांच्या प्रश्नाना वाचा फोडण्यासाठी तसेच जास्तीत जास्त श्रमिकाना भाजपा मध्ये सामील करून घ्यावे.करिता यांची निवड करण्यात आली आहे. शंकर झाडे हे गेल्या काही वर्षांपासून कामगारांसाठी विविध योजना मार्गी लावत आहेत. तळागाळातील मजुरांना आधार देण्याचे काम करत आहेत. याची दखल घेऊन भाजपा पक्षाने कामगार मोर्चाच्या वडवणी तालुकाध्यक्षपदी निवड केली असून .वडवणी शहरातील पक्ष व कामगार संघटनांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### माजलगाव येथे गणेश जयंतीच्या निमित्ताने


# गणपती मंदिर जुना मोंढ्यात श्री गणपती अथर्वशीर्ष पठण

माजलगाव ।प्रतिनिधी

श्री गणेश जयंती निमित्त परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने गणपती मंदिर जुना मोंढा माजलगाव येथे सकाळी ठिक ०७ :०५ वाजता गणेश जन्मोत्सव साजरा करण्यात आला तत्पूर्वी पहाटे पाच वाजता नित्य पुजा व महाभिषेक करण्यात आला व महाआरती संपन्न झाली. यानंतर श्री स्वामी समर्थ सेवा, अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र दिंडोरी प्रणित शाहुनगर माजलगाव येथील बालसंस्कार विभागाच्या वतीने सामुहिक श्री गणपती अथर्वशीर्ष २१ आवर्तने घेण्यात आली. यावेळी श्री गणपती मंदिर जुना मोंढा माजलगाव या मंदिराचे विश्वस्त विष्णुभाऊ मुंदडा, जगदीश चांडक, माधवराव आबा सोळंके, संतोष अब्बड, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, संजय कोकड, अजित भावठाणकर, रमेश चांडक, मन्मथअप्पा लांडगे,प्रकाशभाऊ दुगड, बाबासाहेब सरवदे, गणेश लोहिया, सुरेश बोराडे,प्रदिप रुद्रवार,दिपक



शिनगारे,ओम भुतडा, मोहन घुले, नारायण सातपुते, सुरेश बोबडे ,आशोक गोपाळ,ओम भुतडा,दिनेश मालाणी,तसेच समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी, महिला - पुरुष गणेशभक्त, नागरिक, पत्रकार, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अकलूज - महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या शिवरत्न या निवासस्थानी सत्कार करताना वाफेगावचे नूतन सरपंच एकनाथराव शिंदे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार छंदर तांबडे, मंडळ अधिकारी आबासाहेब नागरगोजे, सेवा सोसायटी पिंपळवाडी चे चेअरमन शामराव तुपे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे




आष्टी ।प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीच्या वतीनं ‘गाव चलो’ अभियान राबवण्यात येत असून तालुक्यातील हाजीपूर येथे आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली मा.सरपंच बुथप्रमुख विठ्ठल राख यांनी गाव चलो अभियान हाती घेतले असून या अभियानाद्वारे मोदी सरकारने मागिल १० वर्षात राबविलेल्या विकास कामांची माहिती जनतेपर्यंत पोहचविली जात आहे.गाव चलो अभियान अंतर्गत मा.सरपंच विठ्ठल राख यांनी गाव पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे.गाव चलो अभियानाला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.या दौऱ्यात विविध घटकांशी संवाद साधण्यात आला.

भाजपने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक बुथ मजबुत करण्यासाठी भर दिला असून त्यासाठी गाव चलो अभियान राबवले जात आहे.आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानात हाजीपूरचे बुथ प्रमुख मा.सरपंच विठ्ठल राख यांनी सक्रिय सहभाग घेत घरोघरी जाऊन लाभार्थ्यांची भेट घेत आहेत.

# कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे चिंचोली येथे रासेयोचे विशेष शिबिर



आष्टी ।प्रतिनिधी

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी संचालित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे चिंचोली ता आष्टी येथे विशेष हिवाळी शिबिराचे उद्घाटन सोमवार दिनांक १२ फेब्रुवारी रोजी प्राचार्य भगवानराव वाघूले, उपप्राचार्य डॉ कैलास वायभासे, परमेश्वर शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

यावेळी प्राचार्य डॉ भगवानराव वाघुले यांनी आपल्या भाषणात सांगितले की, संत गाडगे बाबा दिवसा ग्रामस्वच्छता व रात्री कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करून स्वच्छता बरोबरच समाजातील अनिष्ट रूढी परंपरा, अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न करत होते. त्यांच्या विचारांची समाजाला गरज असून तरुणांनी त्यांचे विचार आत्मसात करावे असे सांगितले. ते डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचोली येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परमेश्वर शेळके तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ कैलास वायभासे, सरपंच हनुमंत अडागळे, चांगदेव एकशिंगे होते. आपल्या प्रास्ताविक भाषणात उपप्राचार्य डॉ कैलास वायभासे म्हणाले की, विद्यार्थांसाठी राष्ट्रीय सेवा योजना फार महत्वाची असून राष्ट्रीय सेवा योजना मुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, जिद्द, स्पर्धा, चिकाटी निर्माण होत असते त्याच बरोबर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत असतो. ग्रामीण भागातील समाजाच्या विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना हे एक प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. यावेळी भाऊसाहेब लांडगे, कार्यक्रमाधिकारी प्रा बाळासाहेब बोराडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला ग्रामविकास अधिकारी विश्वनाथ खेंग्रे, तलाठी योगेश गोरे, अंकुश एकशिंगे, बाबासाहेब एकशिंगे यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ उस्मान पठाण यांनी तर उपस्थितांचे आभार सहकार्यक्रमाधिकारी अंजना गिरी यांनी मानले.

# पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी समिती नेमणार: कृषी मंत्री धनंजय मुंडे यांचा निर्णय



मुंबई ।प्रतिनिधी

पीक विमा योजनेच्या अंमलबजावणी मध्ये सुधारणा करण्यासाठी तसेच इतर पर्यायांचा विचार करण्यासाठी समिती नियुक्त करण्याचा निर्णय कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. राज्यातील पीक विमा योजनेच्या अंमलबजावणी मधील अडीअडचणी दूर करून ही योजना अधिक प्रभावी पद्धतीने राबवण्याकरिता अथवा शेतकऱ्यांना थेट लाभ मिळवून देणाऱ्या अन्य पर्यायांचा विचार करण्यासाठी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीला कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, कृषी आयुक्त प्रवीण गेडाम तसेच कृषी विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला चालू हंगामातील पिक विम्याचा आढावा घेण्यात आला. तसेच आधार लिंक अथवा इतर कारणांमुळे पिक विमा पासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या नावांच्या याद्या ग्रामपंचायत कार्यालयांच्या बाहेर लावण्याची सूचना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केली.चालू वर्षी शासनाने पीक विम्यासाठी भरघोस तरतूद केली. सन २०१६ नंतर सर्वात जास्त पीक विम्याचा लाभ चालू वर्षी शेतकऱ्यांना मिळवून दिला. तथापि, याबाबत वारंवार लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांकडून तक्रारी प्राप्त होत असल्याने पिक विम्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर कराव्यात किंवा काही राज्यांनी शेतकऱ्यांना थेट लाभ मिळवून देणाऱ्या अन्य पर्यायांचा विचार केला असून त्याची कार्यपद्धती, योजना व अंमलबजावणी यांचा अभ्यास करून शासनास शिफारस करण्यासाठी समिती गठित करावी असे आदेश कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी यावेळी दिले.या समितीची कार्यकक्षा व रचना याबाबत वेगळ्या सूचना निर्गमित करण्याचे सुद्धा निर्देश यावेळी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले. सदर समिती एक महिन्याच्या आत शासनास अहवाल सादर करेल.

# ग्रामीण भागातील जातं व जात्यांवरील ओव्या इतिहासजमा

## नवीन तंत्रज्ञानात जुनी साधने अडगळीत



### ग्रामीण भागातील घराघरांतून ऐकू येणारे ओव्यांचे सूर हरवले

ज्योतीराम पांढरपोटे/माजलगाव

पूर्वी पहाटेच्या रामप्रहरी ग्रामीण भागातील घराघरांतून ऐकू येणाऱ्या जात्यावरील ओव्यांचा सूर व जातं आता ग्रामीण भागातील बदलत्या जीवनशैलीमुळे सध्याच्या आधुनिक युगामध्ये इतिहासजमा झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.विज्ञान व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने उल्लेखनीय प्रगती केली आहे. नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात केल्याने जुनी साधने अडगळीत पडल्याचे, कालबाह्य झाल्याचे जाणवत आहे.



यातीलच एक घरगुती व आरोग्यासाठी पोषक असलेले दळणाचे साधन म्हणजेच विशिष्ट दगडाचे तयार केलेले जातं.या जात्याशी ग्रामीण भागातील महिलांशी अनन्यसाधारण महत्त्व होतं.लग्न कार्यात,समारंभा प्रसंगी जात्यावरील हळद दळणे व त्या वेळी गाणे म्हणण्याची पद्धत प्रचलीत होती. शिवाय घरोघरी पहाटेच्या प्रहरी ऐकू येणारी जात्याची घरघर व महिलांच्या आवाजातील बहिणाबाईच्या ओव्या लुप्त झाल्या असून सध्या त्या ऐकावयास मिळत नाहीत.एखादा सण उत्सव असल्यास घरामध्ये त्या त्या प्रकारचे गोडधोड करण्यासाठी तांदूळ,मूग,तूरडाळ आदी धान्येही जात्यावर दळली जात होती.त्यामुळे जाते हे पूर्वी कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा एक अविभाज्य घटकच होता.आता बदलत्या जमान्यात काळानुरूप विजेवर चालणाऱ्या पिठाच्या गिरण्या, गावोगावी-खेडोपाडी दिसून येतात. गिरणीमध्ये दळणासाठी गोलाकार दगडाची रचना असते.त्यात विशिष्ट प्रकारच्या खाचा पाडलेल्या असतात.ही पद्धत पूर्वीच्या जात्याची आहे.आता घरोघरी घरगिरण्यांही उपलब्ध झाल्या आहेत.पिठांच्या गिरण्यांमध्येही स्पर्धा वाढू लागली आहे.परंतु या सर्व गोष्टीत पारंपरिक जातं मात्र काळानुरूप इतिहासजमा झाले आहे.पूर्वी प्रत्येक घरोघरी असणारे जातं आता दिसून येत नाही.यामुळे कुटुंबातील हा प्रमुख घटक दुर्लक्षित झाला आहे.बदलत्या तंत्रज्ञानाचा परिणाम याचेच हे मुख्य कारण आहे.आज आधुनिक युगामध्ये नवनवीन बदल झालेले असले तरी जात्यावर दळणारे सर्व पदार्थ बारीक होऊन आरोग्याच्या दृष्टीने नवीन युगातील मशनरीपेक्षा जास्त फायदे देणारेच होते.

# अंबाजोगाई - आडस रस्त्याचे भाग्य उजळले!

## आ. नमिता मुंदडांच्या प्रयत्नांमुळे ५० कोटींचा निधी मंजूर

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

मागील अनेक वर्षापासून दुरावस्था भोगणाऱ्या अंबाजोगाई - आडस रस्त्याचे भाग्य उजळले आहे. केंद्रीय रस्ते विकास निधीतून या रस्त्यासाठी तब्बल ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी दिली. यानिमित्ताने आ. मुंदडा यांनी या रस्तेकामाच्या निधीसाठी केलेले विशेष प्रयत्न फलदायी ठरले आहेत.

अंबाजोगाई - आडस हा रस्ता मोठ्या वर्दळीचा रस्ता आहे. मागील काही वर्षात या रस्त्याची दुरावस्था झाली. ठिकठिकाणी खड्डे तर काही ठिकाणी रस्ता खचल्याने वाहनधारकांना गाडी चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. खराब रस्त्यामुळे या रोडवर सतत लहानमोठे अपघात घडत असतात. त्यामुळे या रस्त्याच्या कामाला निधी मिळावा यासाठी आ. नमिता मुंदडा यांनी शासन दरबारी प्रयत्न सुरु ठेवले होते.



अखेर आ. मुंदडा यांच्या मागणीची दखल घेत शासनाने अंबाजोगाई - आडस रस्त्याच्या कामासाठी केंद्रीय रस्ते विकास निधीतून ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. लवकरच या कामाच्या निविदा प्रक्रियेस सुरुवात होणार आहे. त्यामुळे आगामी काही महिन्यातच प्रवाशांच्या आणि वाहनधारकांच्या हालअपेष्टा संपणार असून त्यांना खड्डेविरहित गुळगुळीत रस्ता अनुभवयास मिळणार आहे. याबद्दल केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे, बीडच्या खासदार प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

# शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना विषबाधा

खुलताबाद / प्रतिनिधी

खुलताबाद तालुक्यातील तिसगाव येथील आदिवासी आश्रम शाळेमध्ये ९० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना सकाळी दुधातून विषबाधा झाल्याने वैद्यकीय उपचारासाठी तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्र वेरूळ आणि ग्रामीण रुग्णालय खुलताबाद येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.याबाबत अधिक माहिती अशी की मौजे तिसगाव तालुका खुलताबाद येथील आदिवासी आश्रम शाळेत विद्यार्थी हे निवासी शिक्षण घेत असतात या ठिकाणी विद्यार्थ्यांना निवासासह भोजन आणि शिक्षण अशा सुविधा शासनाच्या वतीने देण्यात येतात. या ठिकाणी अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची संख्या ३१७ असून आज दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी आठ वाजता विद्यार्थ्यांना आश्रम शाळा प्रशासनाच्या वतीने उपलब्ध झालेले दूध देण्यात आले होते. हे दूध पिताच विद्यार्थ्यांना मळमळ उलट्या जुलाब यासारख्या त्रास जाणवू लागल्याने काही विद्यार्थ्यांची तब्येत बिघडली होती. संबंधित आदिवासी शाळा प्रशासनाने तातडीने ९६ विद्यार्थ्यांना ग्रामीण रुग्णालय



खुलताबाद आणि प्राथमिक आरोग्य केंद्र वेरूळ येथे वैद्यकीय उपचारासाठी आणण्यात आले. या ठिकाणी विद्यार्थ्यांना आल्यावर सलाईन देण्यात आली तसेच औषधोपचार सुरू आहे.(आज सकाळी आठ वाजता मुलांना दूध दिले होते. दूध घेतल्यानंतर ९६ मुलांना विषबाधा सुरू झाली उलट्या मळमळ सुरू झाली. ग्रामीण रुग्णालयात खुलताबाद येथे २७ मुले पाठवले आहे. याबाबत वरिष्ठांना कळवले आहे संबंधितांवर वरिष्ठांच्या मार्गदर्शनाने पुढील कार्यवाही करण्यात येईल विलास कटारे मुख्याध्यापक शासकीय माध्यमिक आश्रम शाळा तीसगाव) (सकाळी तिसगाव आश्रम शाळेतून विद्यार्थी उलट्या मळमळ चा त्रास सुरू झाल्याने आले आहेत. विद्यार्थी आणि मुख्याध्यापकांच्या म्हणण्यानुसार विद्यार्थ्यांनी दूध घेतले होते आलेल्या विद्यार्थ्यांना आयव्ही (सलाईन) देण्यात येऊन औषधोपचार सुरू करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांची तब्येत आता स्थिर आहे. दिपाली भांदुके, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र वेरूळ ) (खुलताबाद तालुक्यातील तिसगाव आश्रम शाळा या ठिकाणी विद्यार्थ्यांना विषबाधा सुरू झाल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सरकार पळवा पळवी करण्यात व्यस्त असून या ठिकाणी विद्यार्थ्यांवर देखरेख करण्यासाठी कुठेही भक्कम यंत्रणा नाही. गरीब विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळण्याचा हा प्रकार आहे. जे जबाबदार असतील त्यांच्यावर त्वरित कायदेशीर कार्यवाही करावी. नसता आम आदमी पार्टीच्या वतीने जाब विचारण्यात येईल. सतीश देवेंद्र लोखंडे, वेरूळकर प्रदेश युवा संघटनमंत्री, आम आदमी पार्टी, महाराष्ट्र)

# मिलिंद विद्यालयात माता पालक मेळावा व हळदी कुंकू कार्यक्रमास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

परळी / प्रतिनिधी

मिलिंद माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज येथे द्वितिय सत्रातील माता पालक मेळावा व हळदी कुंकू कार्यक्रमास माता पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नांबाबत व प्रगतीबाबत शिक्षक-पालकांमध्ये सकारात्मक चर्चा व्हावी तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत मनमोकळे पणाने संवाद व्हावा या हेतूने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता माता सरस्वती, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले, माता रमाई अंबेडकर यांच्या प्रतिमेस मुख्याध्यापक श्री.कदरकर सर व पर्यवेक्षक श्री.धायगुडे सर यांच्या शुभहस्ते पुष्पहार करून दीपप्रज्वलनाने झाली. हळदी कुंकू



कार्यक्रमानंतर शिक्षक पालक संवाद सत्रात पालकांसह विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नांबाबत व प्रगतीबाबत सकारात्मक चर्चा झाली. चालू शैक्षणिक वर्षात राबविण्यात आलेल्या सहशालेय उपक्रमांचे व्हिडीओ व फोटो या कार्यक्रमात पालकांना प्रोजेक्टवर दाखविण्यात आले. भेटवस्तू देवून व पालकांस चहापानानंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व महिला शिक्षिका व प्राध्यापिकांचे मोठे योगदान लाभले.

# एन.एम.एम.एस परिक्षेत आष्टीचे पंडीत जवाहरलाल नेहरु विद्यालय राज्यात अव्वल

१०९ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पास

आष्टी ।प्रतिनिधी

पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयातील विद्यार्थ्यांनी छ्चचड परिक्षेत उत्तुंग भरारी घेत १०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत या सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मार्फत शासनाकडून ५२,००००० रू. विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होणार आहेत या यशामुळे पालक वृंद माता पालक भगिनी अतिशय आनंदाने उत्साहीत, समाधानी होते तसेच या सर्व उत्तीर्ण विद्यार्थांचा व पालकांचा सत्काराचा कार्यक्रम दि. १० रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाला शेतकरि शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी चे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी भिमरावजी धोंडे साहेब उपस्थित होते. विठ्ठल अण्णा बन्सोडे पालक प्रतिनिधी म्हणून भवर या पालकांचाही तसेच सर्व उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांचे पालक यांचा ही सन्मान विद्यालयाच्या वतीने करण्यात आला व तसेच या यशप्राप्तीसाठी अहोरात्र कष्ट करणारे शिक्षक राजु ससाणे दिनकर देडे ,रवी निकाळजे , हराळ सर, उज्वला मेहेर मॅडम यांचा ही सत्कार करण्यात आला व तसेच या उत्तुंग उत्तुंग भरारी यशाचे शिल्पकार, शिस्तप्रिय, विद्यार्थी प्रिय प्राचार्य सुरेशजी बोडखे यांचा सत्कार संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी आदरणीय भिमरावजी धोंडे साहेब यांनी केला तसेच उतीर्ण विद्यार्थी भोगाडे कल्याणी,शेळके हर्षदा, भोगाडे अनुष्का, गदादे भक्त, चहांदे प्राची, आंधळे प्रगती,आंधळे ऋतुजा जगताप वेदांत, जाधव प्रतिक, ढवळे सार्थक, पवार शिवम,पारखे सुशीलकुमार गर्जे अथर्व,आधळे माधुरी,शेवाळे शरयु,घोडके श्रावणी,करडुळे संकेत,टाफरे अभय गुजर कुणाल,शेख मो.तल्हा, शिरसाठ करण,गवसणे सक्षम,भवर साक्षर गर्जे सागर, खाडे आदित्य,वाल्हेकर सार्थक कोंडे आर्यन,घाटोळे प्रणव,देशमुख विश्वराज,गायकवाड अर्पिता, राख वैष्णवी,कासार दिप्ती, शिरसाठ आदिती, गणगे संस्कृती, बन धनश्री पोकळे श्रावणी साठे साक्षी, राजगुरू विशाखा, निकाळजे सई,शेख सारा, काळे वैष्णवी, आंधळे साक्षी, राऊत प्रिती, तावरे कृष्णा, मराठे शमुवेल गायकवाड आदेश,धुमाळ रोहित, पोकळे समर्थ,पोकळे तनुजा,जरांगे ऋतुमा, गिरी भक्ती कसरे भारती, ससाने प्रतिक्षा, धामणे सागर, राजगुरु आदित्य,घुले सुरज, नरवडे सुरज, गुरव अभिषेक,डोंगरे ओम,वांढरे अनिकेत, सपकाळ सार्थक, पवार अभिषेक कांबळे शिवम, केरूळकर



करण केरूळकर अर्जुन,जगताप इश्वर,हराळ वेंदात,जगताप मयुर,काकडे शिवराज,गुंड ओमकार, खांडेकर प्रतिक,जाधव सोहम,पारखे दिपक,धनवडे सदिप आवारे नैतिक,भारती आकाश,पठाण सौफियान,काळे ऋषिकेश,सांगळे हर्षद,बनसोडे सक्षम,भोगाडे कुणाल, श्रीखंडे विराज, गर्जे ईश्वर, पंडित हर्षवर्धन,भवर संस्कार,झगडे शिवम, खिल्लारे विवेकानंद,सायकड सार्थक,जरांगे राजनंदिनी,शेख जैद, पंडित कशिश, धोंडे विजय, लटपटे विशाल,पन्हाळकर अनिकेत महाजन शिवम,काळे समर्थ,वाघुले करन , बळे सुरज,भोपळे श्रावणी,इरले सिमरण,सुळे प्रणिता,मोरे ज्ञानेश्वरी,विधाते तनिष्का,जाठोत सुहानी,भोंडे प्रतिक्षा,पाखरे जान्हवी,टाफरे अमोल,दिसागज श्वेता यांचा ही सत्कार करण्यात आला

या कार्यक्रमाला माता पालक माता भगिनीही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या,व या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन काळे सुरेश यांनी केले

# महसूल पथकाची अंबडमध्ये वाळूच्या वाहनावर कारवाई

जालना / प्रतिनिधी

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ,अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार,उपविभागीय अधिकारी दीपक पाटील,तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली दि.११ रोजी २४ विना क्रमांकचे वाहन अंदाजे ६ ब्रास वाळू अवैध गौण खनिज वाहतूक करत असताना धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग ५२ वर भोकरवाडी टोलनाक्याजवळ पकडण्यात आले.पथकात नायब तहसीलदार धनश्री भालचिम व मंडळ अधिकारी विष्णू जायभाये होते.

अंबड तालुक्यात साष्टपिंपळगांव,आपेगांव,दोदडगांव, सौंदलगांव, कुरण,पाथरवाला बु,शहागड येथे आज रोजी नियुक्त पथका मार्फत पाहणी करण्यात आली.वाहन चालक आबासाहेब बाबासाहेब मापारी हे रा.मुरमा ता.पैठण येथील असून वाहन मालक तुकाराम गायकवाड हे असल्याचे सांगण्यात आले.वाहनचालकाकडे गौण खनिज वाळुची परवानगी नसल्यामुळे व



तपासणीसाठी सदरील वाहन तहसील कार्यालय अंबड येथे जमा करण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याने त्यांच्यावर पोलीस स्टेशन अंबड येथे गुन्हा नोंद करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

अंबड तालुक्याअंतर्गत अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीवर कार्यवाही करण्याकरीता दिवस व रात्रीचे अस पथके कार्यान्वित करण्यात आलेली आहेत.या पथकाने केलेल्या कार्यवाहीत अवैध उत्खनन व वाहतूक करताना पकडण्यात आलेली एकूण २८ वाहने असुन त्यावर उपविभागीय अधिकारी अंबड यांच्या मार्फत दंडाची आकारणी करण्यात आलेली आहे.अशा वाहनांवर आकारण्यात आलेला दंड ५०.९३ लक्ष एवढा आहे.त्यापासून आज रोजी पर्यंत ३४.१५ लक्ष एवढी वसूली झालेली आहे.तहसील कार्यालयाच्या पथकामध्ये नायब तहसिलदार,मंडळ अधिकारी,तलाठी/ कोतवाल यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.सदर पथकामार्फत एकूण १५ वाळू साठे जप्त करण्यात आली असून उपविभागीय अधिकारी दीपक पाटील यांच्या मान्यतेने शासकिय कार्यालयाच्या मागणी नुसार वाळू साठा शासकिय दरानूसार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.त्यापासुन ३.३५ (अक्षरी तिन लक्ष पस्तीस हजार ) लक्ष एवढी रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.मागील आठवडया मध्ये शहागड येथे ५ ब्रास वाळू तसेच झोडेगांव येथे ८१ ब्रास वाळू जप्त करण्यात आलेली आहे.वरीलप्रमाणे कारवाया सतत सुरु राहतील असे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले.

# दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभागाच्या वतीने शिवजयंतीचे आयोजन

उरण / प्रतिनिधी

दुर्ग मावळा प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी उरण तालुक्यातील द्रोणागिरी किल्ल्यावर शिवजन्मोत्सवाचे आयोजन केले जाते. तसेच विविध कार्यक्रमांचेही आयोजन केले जाते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभागाच्या वतीने १८ फेब्रुवारी व १९ फेब्रुवारी २०२४ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन उरण मध्ये करण्यात आले आहे.



१८ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ८ ते १२ - द्रोणागिरी गडाची सफाई आणि सजावट. दुपारी २ ते ५ - रक्तदान शिबीर ठिकाण विमला तलाव,सायं. ४ वा. - गडावरील कुंडातील पाणी घेऊन खाली उतरने.सायं. ७ वा. - महाराजांच्या मूर्तीचे अभ्यंग स्नान ठिकाण विमला तलाव.सायं. ८ ते ९.३० - मशाल फेरी आणि दिपोत्सव ठिकाण विमला तलाव तर दिनांक १९ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ७.०० वा. - बाळ शिवाजी राजांचा पाळणा हलवणे (विमला तलाव),सकाळी ८.०० वा. - शिवप्रतिमा पूजन (विमला तलाव),सकाळी ९.०० वा. - प्रतिमा मिरवणूक, शिवराज्याभिषेक, दुर्ग पूजन, पोवाडा, व्याख्यान आणि मान्यवरांचे स्वागत तसेच शिवभोजन.सायंकाळी ४.०० वा. - गडावरून खाली उतरणे,सायं. ५.०० वा. निरोप समारंभ असे विविध कार्यक्रमांचे आयोजन शिवजन्मोत्सव निमित्त आयोजित करण्यात आले आहे.सदर सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दुर्ग मावळा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य, आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्था, युवा शिवशक्ती मित्र मंडळ डाऊरनगर चारफाटा, योगा विथ पूनम ग्रुप, सीआयएसएफ स्टाफ उरण, डाऊरनगर ग्रामस्थ आणि शिवप्रेमी मित्र परिवार आदी संस्था विशेष मेहनत घेत आहेत.सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभागच्या वतीने द्रोणागिरी गडावर पारंपारिक पद्धतीने शिवजन्मोत्सव साजरा करीत आहे. यंदाचे हे उत्सवाचे ५ वे वर्षे आहे. त्यामुळे भाविक भक्तांनी, शिव भक्तांनी या शिवजन्मोत्सवात मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभाग कार्यकारी मंडळ आणि दुर्ग मावळा प्रतिष्ठान महाराष्ट्राचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश कावले यांनी केले आहे.

## गणपती मंदिर जुना मोंढ्यात श्री गणपती अथर्वशीर्ष पठण

माजलगाव : अमर साळवे

(दै.महाभारत)

श्री गणेश जयंती निमित्त परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने गणपती मंदिर जुना मोंढा माजलगाव येथे सकाळी ठिक ०७ :०५ वाजता गणेश जन्मोत्सव साजरा करण्यात आला तत्पूर्वी पहाटे पाच वाजता नित्य पुजा व महाभिषेक करण्यात आला व महाआरती संपन्न झाली. यानंतर श्री स्वामी समर्थ सेवा, अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र दिंडोरी प्रणित शाहुनगर माजलगाव येथील बालसंस्कार विभागाच्या वतीने सामुहिक श्री गणपती अथर्वशीर्ष २१ आवर्तने घेण्यात आली. यावेळी श्री गणपती मंदिर जुना मोंढा माजलगाव या मंदिराचे विश्वस्त विष्णुभाऊ मुंदडा, जगदीश चांडक, माधवराव आबा सोळंके, संतोष अब्बड, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, संजय कोकड, अजित भावठाणकर, रमेश चांडक, मन्मथअप्पा लांडगे,प्रकाशभाऊ दुगड, बाबासाहेब सरवदे, गणेश लोहिया, सुरेश बोराडे,प्रदिप रुद्रवार,दिपक शिनगारे,ओम भुतडा, मोहन घुले, नारायण सातपुते, सुरेश बोबडे ,आशोक गोपाळ,ओम भुतडा,दिनेश मालाणी,तसेच समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी, महिला - पुरुष गणेशभक्त, नागरिक, पत्रकार, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सामान्यांसाठी झटणाऱ्या बदामराव पंडित यांना आमदार करण्यासाठी जोरदार ताकद लावा - सुषमाताई अंधारे

## उद्धव ठाकरेंचे हात बळकट करा - बदामराव पंडित

गेवराई / प्रतिनिधी

सत्तेसाठी आपापलेल्या भाजपने राज्यातल्या राजकारणाची वाताहात केली आहे. राज्यात बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, महागाई, शेती मालाला भाव आदी गंभीर प्रश्न निर्माण झाले असताना, त्याबाबत सामान्य जनतेने प्रश्न विचारू नये यासाठी भाजप जातीपाती मध्ये भांडणे लावून जनतेला वेड्यात काढत दिशाहीन करत आहे. यापासून वेळीच सावध व्हा असे सांगून सामान्यांसाठी अहोरात्र झटणाऱ्या बदामराव पंडित यांना आमदार करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन जोरदार ताकद लावा असे आवाहनही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमाताई अंधारे यांनी केले आहे.

मातृत्व ते शिवतीर्थ अभियानांतर्गत शिवसेना उपनेते सुषमाताई अंधारे यांची दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ रोजी गेवराई शहरातील शास्त्री चौक येथे विराट सभा झाली. याप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमास शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी आ सुनील धांडे, युवा सेना विस्तारक ऍड जयेश वाणी, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, जिल्हाप्रमुख गणेश शिंदे, महिला आघाडी जिल्हा संघटिका संगीताताई चव्हाण, ज्येष्ठ वकील ऍड एम एस इंदानी, जिल्हा समन्वयक युधाजित पंडित, जिल्हा संघटक नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, माजी सभापती पंढरीनाथ लगड, माजी तालुकाप्रमुख राजेंद्र बेदरे, युवानेते रोहित पंडित, माजी सभापती अभिजीत पंडित, तालुकाप्रमुख अजय दाभाडे, महिला आघाडी जिल्हा संघटिका शेख फर्जना यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रवक्ते दिनकर शिंदे यांनी केले.

अभ्यासपूर्ण भाषणात पुढे बोलताना




सुषमाताई अंधारे म्हणाल्या की, राज्यात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असताना सुरळीत कारभार सुरू होता. मात्र स्वार्थासाठी भाजपाने पक्ष फोडाफोडीच्या राजकारणाला सुरुवात करून शिवसेना आणि नंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस कडून राज्यात गलिच्छ राजकारण केले आहे. आज सगळ्याच स्तरावर राज्य सरकार सबसेल फेल झाले आहे. गुन्हेगारी, महागाई, बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. धार्मिकता आणि आरक्षण असे भावनिक मुद्दे पुढे करून भाजपा राज्यातल्या जनतेला वेडे समजत, गंभीर मुद्द्यांना बगल देत आहे. हे वेळीच ओळखून सावध झाले पाहिजे. देवेंद्र फडणवीस आणि भाजपाने राज्यात कोणतेही नेते तयार केले नाहीत. तर इतर पक्षात तयार झालेले नेते चोरण्याचे काम केले आहे. शिवसेना, राष्ट्रवादी नंतर कॉंग्रेसला फोडण्याचे पाप स्वार्थासाठी भाजपने केले आहे. ज्या स्व गोपीनाथराव मुंडे यांच्या बॅगा घेऊन फिरणारे देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंडे साहेबांच्या मुलीला म्हणजे पंकजाताई मुंडेंना बाजूला करण्याचे काम केले आहे, हे विसरून चालणार नाही. याचा वाचपा येणाऱ्या निवडणुकीत मतदार काढतील असेही त्या म्हणाल्या. गेवराई विधानसभा मतदारसंघात बदामराव पंडित हे गेल्या अनेक वर्षापासून लोकहिताची कामे करत आहेत सामान्य माणसांसोबत राहून २४ तास त्यांच्या अडचणी सोडवत आहेत. गेल्यावेळी त्यांना संधी मिळाली नाही. मात्र यावेळी बदामराव पंडित हे आमदार असतील आणि त्यासाठी तुम्हा सगळ्यांना एकत्रितपणे त्यांच्या पाठीशी ताकद उभा करावी लागेल असे आवाहनही सुषमाताई अंधारे यांनी केले.

यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांच्यामुळे शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली, कोरोना काळात लाखो लोकांची जीव वाचले. लॉकडाऊन असतानाही अनेक उद्योग आणि व्यवसाय राज्यात आणण्याचे काम उद्धव ठाकरे यांनी केले. मात्र त्यांच्याशी गद्दारी करून त्यांना बाजूला करण्याचे पाप भाजपाने केले हे राज्यातल्या जनतेला पटलेले नाही. त्यामुळे मोठी सहानुभूतीची लाट पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी उभा आहे. त्यांनी केलेली कामे आणि जनतेचा मिळणारा पाठिंबा यामुळे येणाऱ्या २०२४ ला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हा पक्ष सत्तेत येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या सभेला शिवसेना पदाधिकारी आणि बदामराव पंडित मित्र मंडळाचे सर्व पदाधिकाऱ्यांसह शिवसैनिक, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे



वाईस ऑफ मीडिया पंचसूत्री तत्त्वावर चालत आहे

# त्यामुळे जगातील २१ देशात वाईस ऑफ मीडियाचा डंका

## संदीपजी काळे: संस्थापक अध्यक्ष व्हाईस ऑफ मीडिया

ठाणे ।प्रतिनिधी

लढा पत्रकारिता आणि पत्रकारांसाठी चा हे ध्येय उराशी बाळगून पत्रकारांच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र लढणारी देशातील व जगातील नंबर वन ची पत्रकारांची एकमेव हक्काची व्हाईस ऑफ मीडिया ही पत्रकारांची एकमेव संघटना राज्यात, देशात व जगात नावलौकिक करत आहे

वाईस ऑफ मीडिया ही पंचसूत्री तत्त्वावर चालणारी देशातील व जगातील २१ देशातील नंबर वन ची संघटना नावारूपाला थोड्याच कालावधीत आली असून पत्रकारांची व त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी, पत्रकारांना हक्काचं घर पत्रकारांच्या मुलांच्या शिक्षण पत्रकारांचे स्पेलिंग तसेच पत्रकारांचं सेवानिवृत्तीनंतर मानधन किंवा काय हे सर्व विषय घेऊन व्हाट्सअप मीडिया पत्रकारांसाठी ग्राउंड लेव्हलवरून राष्ट्रीय पातळीवर काम करत आहे

नुकताच वाईस ऑफ मीडिया ठाणे महानगर पत्रकारांच्या वतीने महाराष्ट्रातून पहिलीच सुरुवात आरोग्याचा विषय घेऊन आरोग्य आरोग्य संजीवनी महाआरोग्य शिबिर व पत्रकारांना आयुष्यमान भारत कार्डचे वाटप या कार्यक्रमाची सुरुवात ठाणे जिल्ह्यातून झाली आहे यावेळी वाईस ऑफ मीडियाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संदीप जी काले यांच्या उपस्थितीत राज्यातील महत्त्वाच्या नियुक्त्या व ठाणे जिल्ह्यात तील व ठाणे शहर महानगर पत्रकारांच्या खास नियुक्त्या करण्यात आल्या यावेळी कार्यक्रमासाठी ज्येष्ठ साहित्यिक कादंबरीकार नाटककार अशोक जी समेल, ठाणे जिल्हाधिकारी अशोक जी शिंनगारे, जिल्हा माहिती अधिकारी मनोज जी सानप, सिव्हिल




सर्जन ठाणे कैलास जी पवार, जनसंपर्क अधिकारी ठा. म .पान. रवींद्र जी मांजरेकर, भीमेष जी मीथुला प्रदेशाध्यक्ष आरोग्य विभाग, योगेंद्रजी ब दोरकर प्रदेश कार्याध्यक्ष , दिव्याजी भोसले राष्ट्रीय महासचिव ,अरुणजी ठोंबरे कोकण व मुंबई विभाग अध्यक्ष, रामेश्वर जी गवई ठाणे जिल्हा अध्यक्ष, मंगल जी डोंगरे महासचिव ठाणे जिल्हा , इत्यादी वाईस ऑफ मीडियाचे पदाधिकारी उपस्थित होते

# राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या कार्यकर्त्यांच्या जीवाला धोका

## पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांची शरद पवार यांच्याकडे तक्रार...!

पुणे ।प्रतिनिधी

पुणे : सध्या संपूर्ण महाराष्ट्रातील तसेच देशातील राजकीय वातावरण अतिशय खालच्या पातळीला गेले आहे. भाजपाकडून देशात तसेच राज्यात फोडाफोडीच्या राजकारणाचे अतिशय वाईट परिणाम पाहायला मिळत आहेत. पुण्यातील वातावरणही फार मोठया प्रमाणात ढवळून निघाले आहे. राष्ट्रवादीच्या दोन्हीही गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडल्यामुळे प्रशांत जगताप यांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या जीवाला धोका असल्याचा दावा करत वैयक्तिक लक्ष घालावे, असे साकडे खुद्द शरद पवार यांना शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी समक्ष भेट घेत घातले.

'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष' हे नाव आणि 'पक्ष चिन्ह' अजित पवार गटाला देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने दिल्यानंतर संतप्त कार्यकर्त्यांनी पुण्यातील पक्ष कार्यालयातील अजित पवार यांचा नामफलक तोडला होता. तसेच अजित पवार यांच्या विरोधात घोषणाबाजी देखील करण्यात आली होती. त्यानंतर अजित पवार गट आणि शरद पवार गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले होते.त्यामुळे तेथील वातावरण तंग झाल्याचे चित्र निर्माण झाले होते.त्यानंतर संबंधित कार्यकर्त्यांच्या जीवाला धोका असल्याचा दावा करत वैयक्तिक लक्ष घालावे, असे साकडे खुद्द शरद पवार यांना शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी समक्ष भेट घेत घातले.

पुण्यातील शिवाजीनगर येथील निवासस्थानी शरद पवार यांची भेट घेतली. त्यावेळी प्रशांत जगताप यांनी कार्यकर्त्यांसमवेत भेट घेऊन तक्रार केली.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आमदार पात्र की अपात्र यासंदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी चालू आहे. त्याचा निकाल प्रलंबित असतानाच निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाला देण्याचा निर्णय मागील आठवड्यात घेण्यात आला. त्यानंतर पुण्यातील शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्त्वाखाली पक्ष कार्यालयाबाहेर काळया फिती बांधुन निषेध व्यक्त करण्यात आला होता.गली गली मे शोर है अजित पवार चोर है, जो नाही झाला काकाचा, तो नाही होणार जनतेचा, अशा घोषणा दिल्या. तर पक्ष कार्यालयाबाहेर असलेल्या कोनशिलेवरील अजित पवार यांचे नाव हातोडी मारून फोडण्यात आले. या घटनेनंतर अजित पवार गटाचे शहर उपाध्यक्ष दत्ता सागरे यांनी प्रशांत जगताप यांना जाब विचारला, त्यामुळे काही काळ पक्ष कार्यालयाबाहेर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे पक्ष कार्यालय परिसरात कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. या सर्व घडामोडीनंतर दोन्ही बाजूने आरोप प्रत्यारोप सुरूच आहेत.एकंदरीत या घटनेमुळे पुण्याचे वातावरण चांगलेच तापले असून शरद पवार गटाचे कार्यकर्ते दडपणाखाली असल्याचे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी शिवाजीनगर येथील निवासस्थानी भेट घेऊन पवार यांच्याकडे तक्रार दिली.

# यदांचा चौसाळा महोत्सव पुन्हा रंगणार विविध स्पर्धा आणी शिवरायांच्या भव्य मिरवणुकीने!

बीड ।प्रतिनिधी

१९ फेब्रुवारी म्हणजे स्वराज्य रक्षक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती. महाराष्ट्राच्या या दैवताची जयंती महाराष्ट्रात नव्हे तर देशात मोठया उत्साहात महाराजांना मानवंदना देऊन आणी त्यांच्या चरणी मानाचा मुजरा करुन साजरी करण्यात येते.बीड जिल्ह्यातील चौसाळा शहरात देखील छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती गेल्या १८ वर्षापासून हर्षौउल्हासात आणी विविध स्पर्धेच्या माध्यमातून पंचक्रोशीतील नागरिक साजरी करत असतात. यंदाचे हे वर्षे १९ वे असुन यदांच्या जयंतीनिमित्त चौसाळा येथील भवानी ग्रुप व सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती चौसाळा सज्ज झाले असुन. यंदाच्या शिवजयंतीच्या सोहळयात महाराजांची नेत्रदिपक अशी मिरवणूक काढण्यात तर येणारच आहे. परंतु या मिरवणुकीसह या शिवजयंती सोहळयात अनेक कार्यक्रमाची आणी स्पर्धेची रेलचेल असणार आहे. या स्पर्धेमध्ये प्रमुख म्हणजे खुल्या राज्यस्तरीय न्रुत्य स्पर्धेचे आकर्षण असणार असुन , या स्पर्धेसाठी बीड जिल्ह्यातुनच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील नामवंत समुह आपली कला दाखवण्यासाठी व शिवजयंतीच्या सोहळयाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी दाखल होणार आहेत. या न्रुत्याच्या स्पर्धा दि. २४ व २५ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद शाळेची प्रांगण चौसाळा या भव्य मैदानात सादर होणार

# कदम साहेब काय म्हणतंय कारवाई करायची नाही म्हणतंय

## आंदोलकर्त्यास सहाय्यक निंबधक कदम यांची गुन्हे दाखल करण्याची धमकी

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कपिलधार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित तळेगाव यांचे विरुद्ध दप्तर ताब्यात देत नसले कारणाने आवासायक श्री.सांगुळे यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन बीड या ठिकाणी एनसीआर दाखल केला होता.मा. पोलीस निरीक्षक बीड ग्रामीण पोलीस स्टेशन यांनी दखलपात्र गुन्हा नोंद करणे आवश्यक असताना अदखलपात्र गुन्हा नोंद केला असल्याचे दखलपात्र गुन्हा नोंद करण्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनला आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात यासाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी पोलीस अधीक्षक बीड यांना दिनांक २९ नोव्हेंबर २०२३ रोजी पत्र दिले होते.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांच्या पत्राच्या अनुषंगाने दखलपात्र गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी तक्रारदार राहुल शिरोळे यांनी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. आंदोलन दरम्यान सहाय्यक निबंध कदम व संस्थेचे आवासायक सानप हे संस्थेवर कारवाई करण्यात होऊ नये यासाठी प्रयत्न करत आहेत. तसेच




## कपिलधार गृहनिर्माण संस्था मर्या.तळेगाव यांचेवर दखलपात्र गुन्हे दाखल करण्याची मागणीसाठी बेमुदत आंदोलन

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी काढलेले पत्र खोटे असल्याचे सांगून कारवाई करण्यास दिशाभूल करत असल्याचे निदर्शनास आले आहे. जोपर्यंत कपिलधार सहकारी गृहनिर्माण संस्थेवर गुन्हे दाखल होत नाहीत तोपर्यंत बेमुदत धरणे आंदोलन सुरू राहील असे तक्रारदार राहुल शिरोळे यांनी सांगितले आहे.सदरील आंदोलनास वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष गोरख झेंड, पाटोदा तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, जेष्ठ नेते सचिन मेघडंबर, बीड तालुकाध्यक्ष किरण वाघमारे, सदस्य सुभाष सोनवणे, मिलिंद सरपते आदी उपस्थित होते.

सहाय्यक निंबधक कदम यांना अधिकारीपदाचा विसर पडल्याचे आंदोलनकर्त्याला धमक्या देत आहे तुमच्यावर गुन्हे दाखल करू मी अगोदर इथे असलो असतो तर कपिलधार गृहनिर्माण संस्थेवर गुन्हा दाखल होऊ दिला नसता असे सांगून या पुढे कोणतीही कारवाई होऊ देणार नाही असे तक्रारदारास बोलले आहे. सहाय्यक निंबधक कदम हे स्थानिकचे रहिवाशी असून राजकीय पाठबळ असल्याने ते तक्रारदारास दादागिरीची भाषा वापरत आहेत. त्यांची तात्काळ बदलीची मागणी सहकार आयुक्त पुणे यांचेकडे करणार आहे.

अजय सरवदे
युवा नेते, वंचित बहुजन आघाडी बीड



# गेवराई तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना तात्काळ पाणी टँकर चालू करा - कालिदास नवले

## सरपंच कालिदास नवले यांच्या नेतृत्वाखाली २७ गावच्या नागरिकांचे पंचायत समिती समोर आमरण उपोषण सुरू

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील पाणी टंचाई बाबत प्रस्ताव देऊन दोन-दोन महिने लोटले तरीही अद्याप या गावांना टँकर चालू न केल्याने वेळोवेळी पाठपुरावा करूनही प्रशासन कुठलीच दखल न घेतल्याने २७ गावच्या लोकांना सोबत घेऊन रुईचे सरपंच कालिदास नवले यांनी गेवराई पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की, गेवराई पंचायत समिती कार्यालयात आतापर्यंत २७ गावच्या सरपंच यांनी टँकर चालू करा या मागणीसाठी प्रस्ताव दाखल केलेले आहेत. मात्र २ महिने लोटले तरीही कुठलीच दखल होत नसल्याने याबाबत रूईचे सरपंच कालिदास नवले यांनी अनेकवेळा पाठपुरावा करत जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे, गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे व गटविकास अधिकारी कांबळे मॅडम यांची भेट घेऊन वेळोवेळी पाठपुरावा केला परंतु यावर कुठलीच कारवाई होत नसल्याने त्यांनी गेल्या आठ दिवसापूर्वी लेखी निवेदन देऊन आठ दिवसाच्या आत हे सर्व प्रस्तावित असलेले टँकर चालू करा नसता गेवराई पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा ईशारा दिला होता. मात्र यानंतर ही प्रशासनाकडून कुठलीच दखल न झाल्याने सरपंच कालिदास नवले यांनी आज संबंधित गावचे सरपंच यांच्यासह पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाला त.बोरगाव नंदू गाडे, धनेश्वर खेत्रे सरपंच भेंड, शेख फत्तु सरपंच नंदपूर, भैय्यासाहेब नाईकवाडे खेर्डा बु, उमेश खेत्रे माजी सरपंच वाहेगाव, विष्णू राठोड जयराम तांडा, विलास शिंदे, रवी जगले भेंड बु, अविनाश राऊत धानोरा, श्रीराम उबाळे भेंड टाकळी, सचिन खरवडे, सुभाष नवले, रमेश जाधव, शिवप्रसाद नवले, आसाराम लोखंडे, सर्जेराव आरदड, रामनाथ जगदाळे, कृष्णा पवार, शेख जब्बार, वसंत पवार, शरद लाड, दिलीप व्हरकटे, गोराखभाऊ घोंगडे, बाबा जगदाळे, मधुकर नवले, कांताभाऊ नवले, प्रभाकर नवले यांच्यासह अनेक ग्रामपंचायत च्या सरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी या आंदोलनात सहभागी नोंदवत पाठिंबा दिला. दरम्यान याबाबत तात्काळ निर्णय न घेतल्यास संबंधित गावातील सर्व महिला व नागरिक यांना सोबत घेऊन हे आंदोलन चालूच राहणार असल्याचे सरपंच कालिदास नवले यांनी सांगितले.


# निखिल वागळेंवरील हल्ला : मुंबईत २१ फेब्रुवारीला घेणार ठोस भूमिका -एस.एम.देशमुख

## राज्यातील विविध पत्रकार संघटनांचा बैठकीत असणार सहभाग

दत्तात्रय कराळे/परभणी

ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्यावर झालेला प्राणघातक हल्ला आणि एकूणच राज्यातील पत्रकारांवरील वाढते हल्ले या संदर्भात ठोस आणि निर्णायक भूमिका घेण्यासाठी राज्यातील प्रमुख पत्रकार संघटनांची महत्वपूर्ण बैठक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी मुंबई मराठी पत्रकार संघाच्या कार्यालयात होणार असल्याची घोषणा एस.एम.देशमुख यांनी केली आहे.

निखिल वागळे यांच्यावर पुण्यात झालेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यासाठी काल मुंबई मराठी पत्रकार संघात निदर्शने करण्यात आली. त्यावेळी मुंबईतील सर्व प्रमुख पत्रकार संघटना सहभागी झाल्या होत्या.निखिल वागळे यांच्यावरील हल्ला म्हणजे माध्यमांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न आहे. या विरोधात सर्व पत्रकार संघटनांनी एकजूट कायम ठेवण्याची गरज सर्वच वक्त्यांनी व्यक्त केली. निखिल वागळे यांच्या प्रमाणेच राज्यात गेल्या सहा महिन्यात ३६ पत्रकारांवर हल्ले झाले असून निवडणुकांच्या काळात असे हल्ले वाढण्याची दाट शक्यता आहे. या विरोधात केवळ निषेध करून चालणार नाही तर काही ठोस भूमिका घ्यावी लागेल, अशी सूचना बहुतेक वक्त्यांनी यावेळी केली. त्यानुसार विचार विनिमय करून निर्णय घेण्यासाठी राज्यातील प्रमुख पत्रकार संघटनांची २१ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी २ वाजता मुंबई मराठी पत्रकार संघात बैठक घेण्यात येणार आहे. या बेठकीत आंदोलनाची पुढील दिशा ठरविली जाईल. कालच्या निदर्शने आंदोलनास जोरदार प्रतिसाद मिळाला. या आंदोलनात अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद मुंबई मराठी पत्रकार संघ, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ, टीव्हीजेए, मुंबई प्रेस क्लब, म्हाडा पत्रकार संघ, क्राईम रिपोर्टर असोशिएशन, बृहन्मुंबई महापालिका पत्रकार संघाचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.



यावेळी काही सामाजिक संघटना, कामगार संघटनानी सुध्दा सहभागी होत आंदोलनास पाठिंबा दर्शविला. निदर्शकांनी गगनभेदी घोषणा दिल्या. एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निषेध सभेत मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, कार्यवाह संदीप चव्हाण, विश्वस्त राही भिडे, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, मुंबई प्रेस क्लबचे अध्यक्ष गुरबीरसिंग, जतीन देसाई, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे कार्यवाह प्रवीण पुरो, मुंबई क्राईम रिपोर्टर असो.चे शाहिद अन्सारी, म्हाडा पत्रकार संघाचे अध्यक्ष दीपक पवार, मुंबई महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष विष्णू सोनावणे तसेच ज्येष्ठ पत्रकार जतीन देसाई, युवराज मोहिते, संजीव साबडे, संजय परब, एनडीटीव्हीचे मिश्रा आदिंनी निखिल वागळे यांच्यावरील हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला. हे आंदोलन दोन तास चालले. कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. काल राज्यात अनेक ठिकाणी पत्रकार संघटनांनी आंदोलनं करून निखिल वागळे यांच्यावरील हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. कालच्या निदर्शनात अ.भा.मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद अष्टिवकर,(रायगड), मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके, मुंबई मराठी पत्रकार संघाच्या उपाध्यक्षा स्वाती घोसाळकर आणि विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे युनानी दिवस साजरा

दिनांक ११ फेब्रुवारी रोजी गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालय येथे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक बडे तसेच वैद्यकीय अधिक्षक डॉ. मोहम्मद नोमानी यांच्या मार्गदर्शनाखाली युनानी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे युनानी तज्ञ डॉ. सय्यद मुख्तार यांनी युनानी दिवसाबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान डॉ सुवर्णा चौरे यांनी भूषविले याप्रसंगी डॉ. शेख सिराज, औषध निर्माण अधिकारी सय्यद वसीम, पारिचारिका चांदमारे, राठोड, शेरकर, परिचारक चव्हाण कक्षससेवक गणेश नाईकनवरे, सुतार, आडागळे, पवार, निंबाळकर,आरकेएस समन्वयक श्रीमती जाधव उपस्थित होते.

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com